म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. ५०३

काव्य ११३
काव्य ११३१

स्थल ९८३५

५०३

# — वाण्डगूळ —

( विडम्बनें व विनोदी कविता यांचा गाळीव संग्रह. )

५४७२

लेखकः—चं. ग. दीक्षित, पुणें.
डी. एम्. ई. अॅण्ड इ. इ.

प्रस्तावना लेखक—प्रि. प्र. के. अत्रे,
बी. ए. बी. टी. टी. डी. लंडन.

प्रकाशक—मॉडर्न बुक-डेपो बुकसेलर्स व पब्लिशर्स पुणें.

REFBK-0005410
REFBK-0005410

आवृत्ति पहिली. ] [ किंमत १० आणे.

प्रकाशकः—
एन्. टी. भिडे. बी. ए.
मॉडर्न बुक-डेपो.
पुणें, नं. २

(फक्त प्रथमावृत्तीचे हक्क प्रकाशकांकडे. पुढील आवृत्त्या निघाल्यास पुढचें पुढें.
लेखक व प्रकाशक यांचे परवानगीशिवाय कविता छापूं नयेत.)

मुद्रकः—
ग. गो. दिवाकर,
विजय प्रेस, ५७० शनवार पेठ,
पुणें नं. २

## ह्या बाण्डगूळ——

'कॉलेजचें विश्व' या आपल्या विनोदी खंडकाव्यानें, कादंबरीनें आणि हास्यपूर्ण स्फुट लेखांनीं मराठी रसिकांच्या आदरास पात्र झालेले श्री. चं. ग. दीक्षित यांनीं लिहिलेल्या विनोदी व विडम्बन गीतांचा हा अत्यंत गाळीव संग्रह वाचकांच्या हातांत देण्यास त्यांनीं मला विनंती केली. वास्तविक रसिक वाचकांशीं त्यांचा उत्तम परिचय असतांनाही केवळ उपचार आणि मजविषयीं भक्ति या कारणामुळें 'हाताला हात लावण्याची' कामगिरी त्यांनीं मजकडे सोपवली आहे इतकेंच. गेलीं ५—६ वर्षांतील नियतकालिकें, वर्तमान-पत्रें निष्काळजीपणें वाचणाऱ्या वाचकालाही विडम्बनकाव्याची केवढी मोठी धाड महाराष्ट्र वाङ्मयावर आली आहे हें कळून येण्यासारखें आहे. मराठी वाङ्मयावर जी ही आपत्ती आली आहे, त्या दोषाचें खापर बहुतांशीं सर्व लोक माझ्या डोक्यावर फोडीत आहेत याची जाणीव मला आहे. एकादा नवीन वाङ्मयप्रकार साहित्यांत रूढ होत असतांना उत्साहाच्या अतिरेकामुळें जर तो प्रकार प्रसृत करणाऱ्यांच्या हातून कांहीं चुका झाल्या किंवा नियमांचें अतिक्रमण झालें तर ती गोष्ट क्षम्य मानतां येण्यासारखी आहे.

कोणी कांहींही म्हटलें तरी विडम्बन काव्यप्रकारानें आपलें आसन मराठी वाङ्मयांत चांगलेंच स्थिर केलेलें आहे, आणि समंजस टीकाकारांनीही या वाङ्मयप्रकाराची शास्त्रीय चर्चा वेळोवेळीं करून वाचकांचा या प्रकाराविषयीं असलेला निष्कारण पूर्वग्रह दूर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तरी देखील विडम्बन काव्याचें खरें स्वरूप अद्यापिही मराठी वाचकांना कळलें आहे असा खातरजमा वाटत नाहीं. कुठल्याही

प्रसिद्ध कवीच्या लोकप्रिय काव्यांत शब्दापुरती विकृती करून तयार करणें म्हणजे विडम्बन काव्य लिहिणें अशी बहुतेकांची समजूत आहे. विडम्बन काव्य हें सर्वस्वीच परावलंबी काव्य आहे असें नाहीं. एकाद्या विनोदविषयाचें वर्णन लोकप्रिय काव्याच्या चालींत व शब्दांत जर कोणी केलें तर त्यांत मूळ काव्याची विटंबना होते असें म्हणणें म्हणजे निव्वळ दुराग्रह आहे. प्रस्तुत संग्रहातील 'पुस्तकांतील खून' हें काव्य माझ्या 'पुस्तकांतील खूण' या काव्यावरून जरी सुचलें असलें तरी दोन्ही काव्यांचा आल्हाद स्वतंत्रपणें वाचकांना घेतां येणें शक्य आहे. स्वतंत्र गंभीर काव्य लिहिण्यापेक्षांही विडम्बन किंवा विनोदी काव्य लिहिण्यास अधिक कलाकौशल्य लागतें असें म्हटलें तर ती आत्मस्तुति होणार नाहीं.

सर्कसमध्यें घोड्यावरून पडण्याचा आभास निर्माण करूं शकणाऱ्या विदूषकाच्या अंगीं एकाद्या पटाईत घोडेस्वारापेक्षांही अधिक अश्वारोहण कौशल्य असावें लागतें. ज्याला शुद्ध, अविकृत, काव्य-रचना करतां येत नाहीं, त्यांनीं विकृतीपूर्ण विडम्बन लिहिण्याच्या भानगडींत पडूं नये. 'सुंदर चेहेऱ्याच्या माणसानेंच तोंड वेडावलें तर ते सुंदर दिसतें' हें कोल्हटकरांचें वाक्य विडम्बनकारांनीं लक्षांत घेण्यासारखें आहे.

विडम्बन काव्यानें कोणाच्याही भावना दुखावल्या जाऊं नयेत, सर्वांच्याच पोटांत हर्षाच्या गोड गुदगुल्या उठाव्यात असा एक नवीन पक्ष कांहीं 'दयाळू' मंडळींनीं निर्माण केलेला आहे. विडम्बन काव्य हें विनोदी काव्य असल्यानें व उपहास हा विनोदाचा आत्मा असल्यानें विडम्बन काव्यांत उपहासाचा अंतर्भाव झाल्यास ती गोष्ट अपरिहार्य आहे. वाङ्मयांतील अनिष्ट प्रकाराचा उपहास करणें, हा विडम्बन काव्याचा हेतू आहे. हळुवार भावनेच्या कवींनीं विडम्बन

काव्याला इतकें डरून जाण्याचें मुळींच कारण नाहीं. विडम्बन काव्याच्या अभावीं जगांत त्यांच्या दोषाचा उपहास होतच नाहीं असें थोडेंच आहे ?

मराठी वाङ्मयांत उपस्थित झालेल्या नवीन विडम्बनकारांत श्री. दीक्षित यांचे आसन पुष्कळच वर आहे याविषयीं मला शंका वाटत नाहीं. त्यांची विनोदबुद्धि अत्यंत मार्मिक असून त्यांची अवलोकन-शक्ति तल्लख आहे. आधुनिक मराठी काव्यांतील प्रातिनिधिक प्रकारांमधील निरनिराळ्या तऱ्हेवाईक दोषांचा त्यांनीं जागरूकपणें अभ्यास केलेला आहे आणि म्हणून त्यांच्या लेखणींतून उतरलेली पुष्कळ विडम्बन काव्यें सरस आहेत.

'श्रीशारदाप्रशस्ती', 'पळपुटा कान्हा', 'सायकलवर बसणाऱ्या तरुण कुमारिकेस इशारा', 'यांत काय नाहीं ?' 'मी कवयित्री', 'मुख-शुद्धी', 'पळवाट' या कवितांचा विशेष प्रामुख्यानें उल्लेख करण्यासारखा आहे. केवळ काव्याकडेच काय, पण एकंदर आयुष्यांतील निरनि-राळ्या विसंगतीपूर्ण परिस्थितीकडे आणि प्रसङ्गाकडे बघण्याचा श्री. दीक्षित यांचा दृष्टीकोन किती आल्हादपूर्ण आहे हें त्यांच्या काव्या-वरून कळून येतें.

श्री. दीक्षित यांच्या प्रतिभाशक्तीवर मोहरलेला हा फुलोरा त्यांच्या मतानें जरी 'बाण्डगूळ' वाटत असला तरी तो आम्रवृक्षावर उगवणाऱ्या बाण्डगुळासारखा अनवश्यक असा नसून त्यांच्या प्रतिभा-शक्तीच्या विकासाचा तो एक क्रमप्राप्त परिपाक आहे असा निर्वाळा मी देऊं शकेन.

मुंबई ता. ११-१२-३५ प्रल्हाद केशव अत्रे.

———

श्रीमंतांचेच नव्हे तर गरिबांचेही !

# आवडते टेलर

ठरलेल्या वेळीं, नियमित व मनपसंत सर्व तऱ्हेचें शिलाईचें काम केलें जातें. एकवार आपणही अनुभव पहा !

**पत्ता--केशव रामचंद्र भोंडे,**

"आनंदाश्रम" २२ बुधवार, पुणें सिटी.

# महाराष्ट्र फोटो झिंको

पुस्तकांस व छापखान्यास लागणारें सर्व प्रकारचें ब्लॉक करून मिळतात. तसेंच डिझाईनचीं व फोटोचीही कामें होतात. सर्व प्रकारच्या धातूवर एन्ग्रेव्हिंग करून मिळतें.

**महाराष्ट्र फोटो झिंको, ७७ शुक्रवार, बदामी हौदाजवळ, पुणें.**

सुशिक्षित व नामांकित वर्गाचे आवडते

# चहाचें दुकान म्हणजेच

# डेक्कन हॉटेल

ताजा व स्वच्छ माल मिळण्याची उत्कृष्ट व्यवस्था.

गणपती चौक, लक्ष्मीरोड, पुणें सिटी.

# बाण्डगूळ

REFBK-0005410

या पुस्तकांतील

प्रसङ्ग—नेहमींचेच.

कल्पना—सगळ्यांच्याच.

व्यक्ती—साहित्ययोनींतील.

निष्कारण वाद घालण्याचें कारण काय?

तिसरी सलामी—



ग्रंथ नं. ११३१
ता.
१
५४९०

# —श्रीशारदाप्रशस्ती ?

(आपआपल्या काव्यग्रन्थांना फुलाप्रमाणें समजून आजपर्यंत केवळ नजरचुकीनें ज्यांनीं श्रीशारदामंदिरांत आपल्या फुलांचा सडा पाडला, त्यांनीं त्यांनीं खालील खरा प्रकार उघडकीस आलेला पाहून हाय खाऊं नये ! )

लिहिल्या साकाबादप्रमाणें यन्दाही कविता
देवि शारदे ! तुझ्या प्रशस्तीस्तव आलों आतां
आल्या गेल्या उपासकांनीं ‘ फुलें ’ वाहिलेलीं
कुजुनी गेलीं ! नुसती दुर्गन्धी मागें उरली !

सालगुदस्ता आढावा जरि कोणी काढील
गाडीभर तर येथें त्याला ‘ फुलें ’ लाभतील !
खिडकींतुन वा दारामधुनी ‘ फूल ’ फेंकलेलें
कुणी न बघतो नीट ढुंकुनी आंत कुठें पडलें ?

गाभाऱ्याच्या दारांतुन मी कसाबसा घुसलों
दिसली ना तव मूर्ती तेथें किंचित् बावरलों
हिय्या केला, हात सारूनी ढीग करी साफ
तोंच भ्यायलों पाहुनि तेथें अष्टभुजारूप !

महन्मङ्गलें ! ‘ फुलांतुनी ’ तुज उकरुन काढियलें
अहा ! शिङ्कुनी थकलिस तेव्हां नाकीं नव आले !

काय दशा तव करुन टाकिली आल्यागेल्यांनीं
तुलाच समजुनि देवि शारदा ! फुलें दिलीं त्यांनीं ?
महन्मङ्गले ! संबोधन हें सौम्य तुला होतें
महिषासुरमर्दिनी चण्डिका खरीच मज दिसते !
महन्मङ्गले ! छे ! छे ! डाव्या हातीं शेण्डीला
लटकत होता असुर भयानक जीभ काढलेला !
नेत्र बाजुला वळतां दिसली उजव्या हातांत
वीणा कुठली ? समशेरीचें लाल परी पात
उरल्या हातामध्यें भाला धरिला तूं माते !
शस्त्र एक हें पत्र न परि जें पुण्यास निघतें तें !
मोर पिसारा नसे तेथ परि पञ्जा वाघाचा
उग्ररूपधारिणी ! फुलांनीं बसली का वाचा ?
जास्वन्दीचीं फुलें चिकटलीं तुझ्या कपाळातें
असें वाटुनी न्यहाळिलें तों मळवट ते होतें !
नको यापुढें ध्यान तुझें तें बघणें तातोरी !
अर्पायाला फूल त्याहुनी जातों 'शेजारी' !

---

# २

## " दगडफूल आणि दोन शब्द ! "

(एकाद्या काव्यसंग्रहाविषयीं तर हे दोन शब्द नसतील ?)

' महन्मङ्गले ! ' काय आणिलें ' पूजेला ' बोल
शेजारिल बघ वाण्याकडुनी काळ ' दगडफूल '[1] !
' सुकलेलें ' हें फूल कदापी ' तोण्ड न उघडेल '
पाण्यामध्यें भिजत ठेवलें कितीक जरि काळ !
रङ्ग न याला, वास न याला, काळेकुळकुळित
तुझ्या ' औषधापुरतें ' येइल कामीं पण खचित !
करूं नये तें करून चुकलों, काव्य लिहीलें मीं !
छे ! छे कविता व्यवहाराला ठरते कुचकामी !
जरी, तरी, अन्, परी सारखे शब्द पेरले मी
काव्य--रचाइस बाध न यावा युक्ती नव नामी ?
तव रूपाचें करुनी वर्णन जुनें ' कुणी ' छापी
कारण त्याला वाटे अपुली खपेल कीं ' कॉपी ' !
मी न परन्तू त्यांच्यामधला, मी ' नवमतवादी ' !
तुझ्या मन्दिरीं भाण्डूं आम्ही वादी प्रतिवादी !
' देवि शारदे ' ! तोण्डावर तर ' दोन शब्द ' मार
कसें विक्रिला काढूं पुस्तक त्याविण बाहेर ?

---

१ हा कवीचा विनय असावा !

# ३

## ' पुस्तकांतील खून ? '

वाचनाला सुरवात कुठें केली
दोन पानें वाचून जों न झालीं–

तोंच पडलें खोलींत कांहींसेसें !
येति मागाहुन शब्द–काडतूसें !

" पुरे गोष्टी वाचणें !– करा गोष्टी ! "
म्हणें, " फिरवा क्षणभरी वरी दृष्टी ! "

झणीं सुरिची काढून तिनें पात
हीर्य ! लुगड्यावरि मारियला काट !

वाचनांतच लागली मजासि ठेंच;
शब्द पुढती ये, चिरलि जणूं कांच

" रोज नेसूं लक्तरें तीच काय ?
शेवटीं मी, योजिला हा उपाय ! "

सहन करुनी हा तिचा सर्व जाच
शब्द पुढला मी वाचणार तोंच–

डांस बसला नेमका एक तेथें
म्हणुन मिटलें त्रासुनी पुस्तकातें !

दिवस झाले त्याजला किती आतां !
सहज पुस्तक ये आज तेंच हातां,

मच्छराचा त्यांतला बघुनि खून
गतस्मृतिनें मन येत भडभडून !

जिथें वाचन एकदां थाम्बलें तें
अडुनि बसलें आहेच अजुनि तेथें !

फिरुनि फिरुनी उघडितों तेंच पान
परी पचला तो नाहिं अजुनि खून !

मराठी ग्रंथ संग्रहालय
११३९
३/०५

३७

# ४

# कवि आणि मत्कुण ?

बाले[1] रोज जरी प्रभातसमयीं तूं ठोकिशी ढेकण्या
थोडा कांहींतरी विचार असूं दे कीं देति त्या यातना
रागानें बहु आणिसी करिं तयां रस्त्यावरी सोडण्या
केला काय असा गुन्हा कि जन त्या सर्सावितो मारण्या !

निद्रेमाजि मृदूल हात फिरवी गालावरी नाथ ना ?
झाली हर्षित तों क्षणांत चिडली देखोनिया मत्कुणां;
कीं रात्रीं तव प्रेमताम्बुलि तयां शिकांव केला जरा
प्रेमाचा मग गोड (?) घोट गिळतां झाला कसा चेहरा ?

ओष्ठाला भिडणार ओष्ठ असतां तों चावलें कांहिसें
झाली लाल बघून मत्कुण मिशामध्यें पतीच्या वसे ?
मत्कूर्णीं धरण्यांस राग तुजला हीं कारणें कां खरी ?
मत्कूणांपरि वाढ होत कविची प्रत्येक हल्लीं घरीं !

---

१ युवती ( अलिकडचा अर्थ )

# ५

# पळपुटा कान्हा ?

( चाल:—गोकुळिचा कान्हा कोणी )

( 'प्रस्तुत' कविता हातावेगळी करतांना 'प्रस्तुत' कवीला अशी 'आशा' वाटतें कीं यापुढें 'कृष्णावर' कविता करण्यास कोणीही धजणार नाहीं ! )

पाहिलात 'कान्हा' कां हो ? ज्यास 'दोन हात'
हाय ! आज शिल्लक 'लोणी,' 'कृष्ण' ना घरांत ॥धृ०॥
'निळा सांवळा' हा कृष्ण
नसे रङ्ग रूपीं प्रश्न ?
'स्वान इङ्क' पिउनी गेला, रितीं येथ दौत !
आठवार असतें धोतर
नेसतों सदा गुडघ्यांवर
मारवाडि जणुं सजलेला दिसे 'कृष्ण कान्त'
फिरे सारखा तो उघडा
वीर बल्लवासम तगडा
'बाण्डकें उसाचें' असतें नेहमीं मुखांत
सर्वे घेउनीया झोळी
मण्डईत एके काळीं
घरांतून गेला त्याला दिवस खूप होत.
सकाळींच थोडा तुसता

चहा घेतला त्या होता
मोलमजूरीनें आतां भरे काय पोट ?
" कृष्ण अतां मोठा होशी
लग्न करी रे यमुनेशीं "
असें त्यांस म्हणतां, टाकुनि जाय ताकभात !
झणीं सोडुनी ये रुसवा
' कृष्ण, ' चावती मज़ पिसवा
' फ्लीट ' कोण मारिल आतां ' अहह ' प्लेग–गांठ !
' कृष्ण ! ' तुझी ' राधा गौळण '
खिळलि ' धरुनिया ' अन्थरुण !
तिला एकदां तरि येउनि, शेवटचें भेट !
शोधुनी कुणी तरि आणा
' टोकाळि 'चा माझा ' राणा '
त्यांस ' पांच रुपये ' देइन ' बक्षिशी ' खुषींत !
नसे बातमी ही खोटी
मिळे ' गाडिभाडें ' वरती
' केसरींत ' वाचा गेल्या, दिली ' जाहिरात ' !

---

१ कृष्णाच्या खेडेगांवाचे नांव !

# ६

# ' मिशा आणि माहात्म्य ' !

कुणा कविला रस्त्यांत कधींकाळीं
नको बघण्या तें दृश्य ये कपाळीं
गोष्ट होती आश्चर्य वाटणारी
दिसे मार्गीं सुन्दरी पाठमोरी !

झपाट्यानें कवि जाय तिच्यामागें
धोतराचे खोवून नीट सोगे
तोंच, मार्गे ' ती ' नजर जरा देई
कवी पडला रस्त्यांत, भुरें येई !

आणि कविला ब्रह्मांड आठवीलें
मनीं वदला, " हें कुठुन कसें झालें ?
' हाय ! ' डोळ्याचें लवे जों न पातें
कुठुन 'त्यांनीं' व्यापिला प्रान्त 'येथें' !

गुलाबाला, अन् तसे केतकीला
फणस, हलवा अन् तसे अननसाला
गोड असल्या वस्तूंस जसे काटे
सुन्दरीला तैं मिशांचे फराटे !

सले नुसती कल्पना ही मनास
सुन्दरीच्या परि पाहुनी मुखास
उभा राही तत्काळ अङ्गि कांटा
मिशा ओठांतुन काढतात वाटा ! "

कुणीं शुद्धीवर आणण्या कवीला
दिला जोडा घांसून हुङ्गण्याला
तडक कविनें गांठलें दार घरचें
वदे, " फिटलें पारणें लोचनांचें ! "

पुढें कविनें वर्जिलें प्रेमकाव्य
थोडक्याशा पण मिशांचा प्रभाव !
कुणा कविच्या हृदयांत बोंचणारा
कोण कांटा काढील हा विचारा !

---

क्रा. ३/११ ९९३१
ता. ७



# सायकलवर बसणाऱ्या तरुण कुमारिकेस इशारा !

झोंक तोल, तोल, तोल ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।

वाऱ्यावरती उडणारा गे
अन्चळ अपुला आंवरुनी घे
खोंच नीट सुटलेले सोगे
पातळ तव फाटेल ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।

केसांची ती घालुन पेंडें
वेगानें जातेस जरि गडे
तरी चुकविशी राडेरोडे
वदती तुज 'इरसाल' ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।

पण वळणांवर जरा जपोनी
वेग अगोदर कमी करोनी
'ब्रेक' दाब मग दो हातांनीं
पेल तुझी तनु ढोल ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।

तो बघ मध्यें गवळी येई
मागुन मोटारींची घाई
पडेल चरवी जपून घेई
मागिल ना तर मोल ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।

उतर कोपऱ्यावर त्या आधीं
ना तर होईल व्यर्थ उपाधी

म्हणती, ये ' इब्राहिम लोदी '
कारण उधळे पोळ ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।
पडतां चुकुनी, वदतिल तुजला
'हत्ती जणुं गाळांत अडकला ' !
' वा ! चिखलाची तीट मुखाला '
अन् 'फिदिफिदि' हंसतील ग, रस्त्यांत चिखल लइ खोल ।
देह तुझा गे आधिंच नाजुक !
लोडाला ठरवीलहि काटक !
पाय मोडला तर मग आणिक
कोण घालि तुज माळ ग ! रस्त्यांत चिखल लइ खोल ।

---

## ८

# चवथीचा चंद्र.

तोल सुटुनी गणराय खालिं आले
मूषकाच्या वाहनीं बैसलेले
फिरुनि उठण्याचे कष्ट फार झाले
नील मेघांतुनि म्हणुन चंद्र खिदळे !

स्वच्छ पीतांबर माखला धुळीनें
साफ करिती लाजून बहु त्वरेनें
सुधांशूचें तों पडे हास्य कानीं
आणि गेलो तोंडून शापवाणी !

पंत निघती जाण्यास ह्पीसाला
शुभ्र लेवुनिया पॅन्ट बूट डगला
सायकलिवर तो स्वार सज्ज झाला
पोट भरलें मोदकें, तोल सुटला.

पांच तासांनीं परतणार स्वारी
विचारानें या अश्रु येत भारी.
पतीदर्शनि ये म्हणुन पत्नि दारीं
तिजासि पन्तांची कळलि तों हुशारी.

शेणमाती कपड्यास लागलेली
पाहुनीया बाजूस दृष्टि वळली

हास्य मुद्रा पत्निची तोंच दिसली
झणी क्रोधानें तिला शापियेली.

‘ मुखाचा तव चन्द्रमा नाहिं बघणें
हीच शिक्षा तुज योग्य असें देणे. ’
असें साङ्गुनि तिज, मार्ग सुधारीला
खिन्नवदनें मग पत्नि ये गृहाला

थकुनि भागुनि जधिं पन्त घरीं आले
मञ्ज्जु कंकणस्वर श्रवणिं तोंच आले
चहा घेउन चन्द्रमा पुढति आला
कोप पन्तांचा झणी उडुन गेला.

हांसुनी ते चन्द्रम्याजवळ जाती
सर्व पुढलें कळणेंच अनुभवान्ती !
बंदि केली जरि चंद्र पाहण्यातें
रम्य कांती तरि सहज लक्ष घेते.

---

ता. ........ नं. .. बाण्डगूळ
ता. ........

# १

# गाडगेबुवांची कन्था !

कुम्भाराच्या दुकानांतलीं देखुनिया मडकीं
कुण्या कवीची जागृत झाली स्फूर्ती पण सुतकीं !
संक्रान्तीचा सण लुटण्याला 'सुगडीं' बहु जाती
भाग्य तयांचे ये उदयाला किति ललनाहातीं !
मिळतें रथसप्तमीस प्याया दूध ' बोळक्यांस ' !
कुणी थण्ड दे स्टेशनांवरी जल पान्यस्थांस.
' वद्या ' बोहल्यांभवंती बसती एकावर एक
मङ्गलकार्यीं रंग फांसुनी यांतिल कित्येक.
कुणी नवशिका नापित शिकण्या ' डोकें करण्याला '
यांपैकीं तो चुना लावुनी घेइल एकाला !
शेतकऱ्याच्या घरांवरीं जे जप्ती आणीत
फक्त ' गाडगीं मडकीं ' येथिल त्यांना दिसतात !
पैशास्तव गाडण्या गाडगें कुणास लागेल
धन्य होय तें धनिकाच्या जें हातीं येईल !
गरिबांच्या घरिं मडक्यांची तर असते बहु सलगी
तिन्ही त्रिकाळीं तेथें भरते पोटाची खळगी !
दहिंवालीच्या डोक्यावरती कुणी नाचतात !
गरम रोजच्या आंघोळीला पाणी परि मिळत !
वर्गावरती मास्तर चिडले कीं विद्यार्थ्याला
कधीं कधीं मडक्याची उपमा मिळते डोक्याला !

‘सांठवण्याला’ यांच्यामधले किती एक गेले.
घरोघरीं तर चुना, मीठ वा चिन्चेचे गोळे !
‘स्वयंवरातिल’ नटी ‘रुक्मिणी’ दे न खडा साखर
‘गन्धर्वाची’ जुनी मण्डळी म्हणुन बघे ‘येरू’ !
‘बागुलबोवा’ करुनी याचा ठेविति शेतांत
अन्त्यविधीला याविण राही खोळम्बुन प्रेत !
‘दहिकाल्याला’ नशिब परन्तू मडक्याचें फुटतें
गोपालाच्या पदरीं पडुनी पवित्र तें होतें !
एकाद्याच्या हातुन जर का फुटलें तें असतें
तर मग ‘खापर’ कुम्भाराच्या माथ्यावर बसतें !
एकच माती मळुनी केलीं सर्व जरी मडकीं
तरी निराळी गति प्रत्येका मिळते इहलोकीं !

# १०

## —तिळगूळ—

( जाति—मुद्रिका )

**पत्नीः—** हातांत पहा मी काय आणिलें बरें, आणिलें बरें
ओळखा गडे आधीं अन् ते तुम्हीच घ्याहो त्वरें

कां कुंठित झाला ? अतां निराशा सरे, निराशा सरे
सण आज कोणता आहे ? ही खूण न कांहो पुरे ?

**पतीः—** सण करायास साजरा मिठाई मिळे, मिठाई मिळे
पण मी जी घेईन त्यातें नवपदार्थ मज आढळे.

तव गालीं पसरे रङ्ग जरासा गुळी, जरासा गुळी
अन् गूळच भरला वाटे तव अधराचे मोहळीं.

परि तिथेंच काळा तीळ शोभतो तुला, शोभतो तुला
कीं, बेसन लाडूमध्यें बेदाणा जैं टाकला.

मज देवानें तिळगूळ तुझा धाडिला, तुझा धाडिला
'संक्रांत तुझी आली' हें हा कान्त कधीं बोलला ?

तिळगूळ तुझा टाकुनी दुजा कोणता, दुजा कोणता ?
घेईल कोण रसगुल्ला कीं, बासुन्दी प्राशितां ?

—

# ११

## उभारलेली गुढी?

चैत्रमासीं पाडव्या कारणानें
गुढ्या चढवूनी सजलि सर्व सदनें
रङ्गि बेरंगी ताटवे फुलांचें
त्यजुनि बागा ये आश्रया पथाचे !

केशरानें कर कुणी हळदि केले
कुंकुमाचा तर रङ्ग गालिं खेळे
लालि चढली बा ! उन्हानें, कशानें ?
प्रश्न मनिं हा सोडीव विचारानें

हळदिकुंक्वाला गांवगौरि निघती
अशा समयीं घरकुक्कुटांचि दाटी
गल्लि, गॅलरि अन् गवाक्षें घरांचीं
होत माऱ्याचीं ठिकाणें जनांचीं

करायाला सर 'भुईकोट किल्ला'
नयन—साङ्गिनि रोखून करिति हल्ला
कुल्फि मेवा कीं असें चाखण्याला
कल्पि गोळे नव्हतेच लढाईला

अङ्गयष्टी, होतीच वंशकाठी
गड्डू चकचकतो, शिरीं चट्टि पट्टी,

गांठि नाहीं तर, उपरणें गळ्यांत,
'गुढी' पन्तांची उभी गॅलरींत

नर्यांचे ते 'चौकडे' पाहण्याला
चैत्रचातक बघतात मुहूर्ताला
देउनीया वास्तव्य गॅलरीला—
वास्तु बसवीती गुढी पाडव्याला !

---

मराठी ग्रंथ संग्रहालय
नों. क्र. ३१.५ नं. ११३१
ता.
ठाणें.

# १२

## —'यांत काय नाहीं'?—

बांधवा, लौकिक घे कमवून् ॥ ध्रु० ॥

**हॉटेलवाला:**—शिळ्या भज्यांची दुसऱ्या दिवशीं चटणी ठेवि करून् ।

**मारवाडी:**—खातेवहिवर ढब्बूचा तूं रुपया घेइ लिहून् ।

**खानावळवाला:**—वाढि कधीं तूं भाजीसङ्गे झुरळाला शिजवून् ।

**सायकलस्वार:**—अहा अङ्गना दिसतां घेईं 'गाडी' तिजजवळून् ।

**विद्यार्थी (शाळेंतील):**—जुनीं पुस्तकें विकूनी जा तूं सिनेमास चोरून् ।

**विद्यार्थी (कॉलेजांतील):**—बघतां युवती झुरून घे तूं गालफडें बसवून् ।

**टॅक्सी ड्रायव्हर:**—गाडीमधल्या उतारूंना तूं स्वर्ग देइ दावून ।

**वकील:**—खुशाल देई कोर्टावरतीं रोज झोंप ताणून् ।

**गवळी:**—पाणी मिसळुनि शेर दूध दे सव्वाशेर करून् ।

**मवाली:**—जमाव दिसतां त्यांत घुसोनी ठेवि 'खिसे' उसवून् ।

**नट:**—मिळतां थोडीबहु प्रसिद्धी कंपनि जा सोडून् ।

**पिठाचा गिरणीवाला:**—दळणांतुनि तूं मूठ मूठ घे पीठ रोज काढून् ।

**घड्याळजी:**—दुरुस्त करण्या घड्याळ देतां 'खोका' देइ करून् ।

**मास्तर:**—वर्षाकाठीं सुट्टी घेई नउ महिने चोपून् ।

**शिपी:**—अघळपघळ कापड घेवोनी 'शॉर्ट कोट' बेतून ।

**धोबी:**—संप पुकारुनि कपड्यांची दे खुशाल होळि करून् ।

**हेडक्लार्क:**—घरचीं कामें हपीसांतल्या शिपायांस साङ्गून् ।

डॉक्टरः–देउनि 'इन्जेक्शन' शरिराची चाळण टाक करून् ।

व्यापारीः–पेढी बुडवुनि गरिबांची घे टाळू साफ करून् ।

विमाएजन्टः–विमा उतरुनी घेण्यासाठी 'भाजी दे आणून् ।'

टाङ्गेवालाः–पैशासाठीं दाराशीं घे 'बामन' उद्धारून् ।

पोलिसः–चौकींवरतीं खडे राहुनी घेइ शिव्या हसडून् ।

सोनारः–तिच्या गोठपाटल्यांतुनी घे घरच्या वांकि करून् ।

नापितः–कुठें कापतां वस्तऱ्यामुळें फुङ्कर घे मारून् ।

बातमीदारः–फुकट नाटकें पहावयाला हजर नित्य राहून् ।

लेखकः–दुसऱ्यांच्या कल्पना आपल्या लिखाणांत घुसडून् ।

पेन्शनरः–पेन्शन घेण्या जीव जगविणें पर्वतीस जाऊन् ।

भाडेकरूः–भाडें बुडवुनि अखेर जाई रातोरात पळून् ।

# १३

# ' मी कवयित्री ' ?

( पत्नीच्या अस्वस्थतेचीं कारणें तिचा नाथ तिला विचारतो आहे व ती त्यास प्रसङ्गोपात्त अशीं उत्तरें देऊन त्याला किन्चित्काल संभ्रमांत ठेवित आहे. )

तुला काय हवें ? औषध ? ' छे ! मी न अजारी ! '
दिसे गालफुगी केवढि ? ' तोन्डांत सुपारी '
असे आम्बट कां तोंन्ड तुझें ? ' खातच कैरी '
खळे ओघ न ? ' डोळ्यांत सले काजळ भारी '
' कसेसेंच मला वाटतसें येऊन घेरी '
दहीभात पहा कालवतो, ' येत शिसारी ! '
अगे ! थाम्बुन घे[1] चुम्बन, वाटेल हुषारी
' नको आजच तें; शिल्लक राहील उधारी.'
पहा ! ढांस उठे, घेइ खडीसाखर पत्री
'मला रोग न, काव्यांत झुरे, मी कवयित्री ! '

---

१ औषधाचा ' डोस ' जसा थाम्बून थाम्बून घेतात त्याप्रमाणें घेणें !

# १४

# जरा तरी वद उठून !

[ कथानकाचा घात व संहार पुढील ओळींत एकदमच दिला आहे.—' एक भोजनभाऊ भटजी दररोजच्या पंचपक्वान्नांच्या भोजनानें घरीं येतांच, सुस्त झाले असल्यामुळें सुस होत. त्यांच्या पत्नीस यामुळें कसेंसेंच वाटे व म्हणून ती आपल्या यजमानांची आपल्याशीं थोडावेळ तरी बोलण्याकरितां आळवणी करीत आहे. किती करुण रस!' ]

" घोरसी असा कां जेवून । जिवलगा । जरा तरी वद उठून ॥
भोजनें कितिक झोडलीं
ती अङ्गावर ना आलीं !
म्हणुनि का फुगलि ' धनुकली[1] ' । जिवलगा

कढिभात वरण सान्डलें
ते आंघळ ना कुणि पुशिले
स्नानास पाणि उपसलें । जिवलगा

वाहे अयाङ्ग तव ' मुखरस '
मान्जर चाटी करुन ' फिस्‌फिस '
याचि दाद न काशि तुम्हांस । जिवलगा

दबु नये तनू आपुली
काळजी म्हणुन घेतली
ही वशी कुशिस ठेविली । जिवलगा

---

१ धनुष्यासारखा झालेला पोटाचा आकार.

कशि पहा खिन्न बैसली
पळि पन्चपात्रि आपुली
उचलुनी म्हणा ‘ छबुकली ’ । जिवलगा

धर खारीक खाया तुला,
‘ इकुडच्या ’ परी पोटाला
करुं नको बाळ गुदगुल्या । जिवलगा

ही पहा उन्हुन आणिली
साजूक खव्याची पोळी ! ”
भटजिची सुस्ति सम्पली । टाकली । चट्टदिशीं खाऊन् ॥

---

# १५

# अरुणानन्तर निशा !

( जाति–स्वर्गङ्गा )

( अरुणाच्या अस्तानंतर निशा आपलें अस्तित्व पटविते, ही सत्यसृष्टींतील प्रचीतीची गोष्ट, सत्यसृष्टींतीलच कांहीं उदाहरणें देऊन जास्त स्पष्ट केली आहे. आजतागायतच्या, 'अरुणावर' केलेल्या सर्व कवितांवर ' काजळ ' फासण्याचा, प्रस्तुत कवीचा इरादा नाहीं. तसा गैरसमज कोणी करून घेऊं नये. )

अरुण चहाचा बशींत विलसे. जोम जनांचा तो चढवी
पडे तयांवर धांस मिशांचा, प्राशित असतां कुणी केवी

शीण जावया म्हणुनी प्याला, मद्य कशाचें ! अग्नी तो
जास्त जाहली निशा चढे मग हवा गटाराची खातो

आग लागली, तुफान वारा, जळून वाडे उजाडती
आणि कोळसा खरेदि करण्या लोणारी दाटी करिती.

पन्त चालले ' विलेपार्लीं[२] ' गुलाब द्याया पत्नीला
गाडि थाम्बली अन् अन्धेरी बघुनी ये 'अन्धेरीला.[१]'

अङ्गकान्ति मुसमुशीत शोभे, वाटत कीं जणुं चंद्रकला
त्यावरि ल्याली कुणी सुन्दरी काळसावळी चन्द्रकळा

---

१ या ठिकाणीं दुसरें पात्र घालतां न आल्यामुळें, वाचकांच्या पुढें कवीची फजफजळ मांडली आहे. २ हीं दोन रेल्वेची स्टेशन्स् आहेत.

साहेबाचा लाल शाइचा शेरा मिळतां बुकावरी
'आ' वासुन कां उभी राहिली बेकारी अन्धःकारी
तव वदनाला देखुनि वदलों खुजांत[1] भरली काव कुणी
तों, कोर्षे त्वां केस आणिले वदनांवरि अपुल्या अरुणी.

---

१ खुजा पालथा घरला कीं जो आकार दिसतो, त्या बरहुकूमच किंवा मुलखा मानेवर पेलता दिसत होता.

# १६
## आप्पांची आठवण !

( जाति--रसना )

आत्याः—

ती लम्बकार्णी आत्या
लुंगावतां यमानें
कानांतुनी दिलासे
सोडोनि प्राण तीनें

ढोसून हात वदनीं
काढील कोण वान्ती ?
खायास उन्दरांना
आतां कुठून वाती ?

मेत्कूट, भाजणी अन्
पापड वाट पाही
बरणीच लोणच्याची
'आ' वासुनी बसे ही

नयनांत घालुनीया
बैसेल कोण सुरमे
तरि येइ येइ वेगें
हरिदास रोज विरमे.

**स्वयंपाकीण**:—( आप्तांच्या यादींत नांव काढण्यासारखा (?) असा हा एकच आप्त होय. हिला बहुधा 'बाई' म्हणण्याचा प्रघात आहे. )

हफिसांतुनी घराला
येतां असेल दारीं
देईल कोण आधी
हातांवरी सुपारी.

खुर्चीस हालवोनी
हातांत पेय देसी
जाणीव पत्निची त्वां
करूनी उणीव भरसी.

बाई, तुझ्याच वदनीं
मित भाषणीं मिठाई
बाई तुझ्याच शरिरीं
लवचीकता सवाई !

गिळिलीस चोरुनी जें
त्वां पावकी तुपाचीं
तें काय बोललों मी ?
मग खोटि कां घडीची ?

ये ये निघून वेगें
सुकलेंत शेंगदाणे
मी रोज वाट पाही
भिजवून साबुदाणे !

वात्सल्य गाढ पोटीं
त्वां प्राशिल्या चहाचे
वास्तव्य मात्र ओष्ठीं
'त्या' काजळी मिशांचें
शाळेमधें मुलांना
शिकवा स्वरांत सप्त
'सैंपाकिणी विना हो
विधुरा न अन्य आप्त!'

उपसंहारः—(मृत्यूचा 'मोहल्ला' तोच, पण, त्यांत जाण्याचे मार्ग मात्र निरनिराळे आहेत.)

मामांस मृत्यु आला
मामींस बोळविलें
बाबा खलास झाले
दादा तसेच गेले
निपचीत सासु निजली
परलोकिं माय गेली
फिरवून श्वेत डोळे
आत्या चुलीशिं पडली.
श्वशुरांस श्वास लागे
पुल्लिंगी आप्त मेले
पत्नीस प्रीत बाधे
स्त्रीलिंगी आप्त सरले
मीं पोरका जगीं या
आप्ताविना 'मवाली'

तरि रेवड्या, मिठाई
कुणि द्या मला सुकेळीं
कांहीं करा परन्तू
तुम्हि सर्व या घरांत
का देउ जाहिरात
मी आज ' केसरींत ! '

---

# १७
# बालगर्दभ ?

( गज्जल:—वृत्त—गाढव—दुडकी )

गोडशा तूं नर्तनानें लाजवीशी अप्सरा
रोडयष्टी जाहली अन् कष्ट घेई चौखुरा
'[१]'नाक्झरी' ची रागदारी साठली कण्ठीं तुझ्या
कावळ्यांच्या मञ्जुताना वाटती का घोगऱ्या ?
माङ्ग वा गाञ्जेकसांनीं गुङ्गले जे रङ्गले
भङ्गली त्यांची समाधी ऐकुनीया 'त्या' [२]सुरा.
लम्बकर्णा मञ्जु (!) कर्णा उञ्चला टव्कारुनी
ठुम्बरी का भैरवी तो काय गानाचा फवारा ?
मस्त रेडा वेद बोले काय आवाजी असे ?
बांसरी बन्सीधराची कोण साङ्गे वापरा ?
दोन लोळ्या डूल कीं जे लोम्बती नाकांत का
फेन्दरोनी काढिशी तूं सूर खर्जी कांपरा.
कष्ट घेती, वेळ येतां, झोडताती सर्वदा
घाणकेरांवीण नाहीं घास देती दूसरा ?
लम्बकर्णा, लोळशी जेव्हां उकिर्डी झिंगसी
गुङ्गसी हुङ्गन तेव्हां स्वर्गरूपी मोगरा.
मानवाच्या कीं करावें वाटुनी वीडम्बना
निर्मिलें का हाय सैतानें तुला, 'खर्जस्वरा !'

---

१ पुण्यनगरीचा एक अलंकार. २ सर्वांच्या परिचयाचा आहेच.

# १८

## 'डागळलेला चन्द्र?'

लाल गोल तो चन्द्र टाङ्गला एकच आकाशीं
परन्तु दुसरा नजीक होता पेङ्गत डोक्याशीं

त्या चन्द्रावरलीच हुबेहुब लाली होती येथें
चेहेऱ्याचे साम्य तेंच ते जणूं जडे नातें.

काळ्या डागांमुळें हीनता त्या चन्द्रां येते
ओठावरच्या नैसर्गिक तर मिशामुळें येथें?

आकाशांतिल चान्द म्हणोनी टक लावुन बघती
परन्तु बघता चन्द्रा माझी डोळे कां मिटिती?

अखेर कळुनी चुकले मजला, मी तर हतभागी
पृथ्वी वरल्या चन्द्रावरती डाग नसावा कधीं?

## ११

## 'मगच लग्न जोडा' !

माडीच्या खिडकीमधें कवि कुणी काव्यीं पहा गुन्तला ।
'भिक्षांदेहि' करावयास वधुचा आला पिता त्या स्थळा ।

"का हो, लग्न तुम्हांस काय करणें ?" त्यातें पुसे जाउनी ।
दावी "होय" कवी हंसून म्हणुनी काव्यांत त्या गाउनी ॥

नाक मुरडुनि वधुपिता चालु लागे ।
निघे धांवत कवि पुशित तया मार्गें ।
शब्द पडले तों, "नको प्रेमवेडा ।
आधि जाउनि आपुलें काव्य फाडा !"

# २०

# लेखनसंन्यास.

[ एक विलापिका ]

कीं, अखेर लिहुनी थकला । संन्यस्तव्रता आचरला ॥ धृ० ॥

अभिजात लेखकाच्या तो, पदवीला कैसा चढला ।
कारकून आधीं असतां, मागाहुन लेखक बनला ।
केवढी चिकाटी थोर ? जणुं पचवी बेलफळाला ।
'कविशार्दुल' कैसा झाला, हें गूढ सांगतों सकलां ।
वर्तमानपत्र-कचेरी
सम्पादक होत पुणेरी
' त्यां ' दाविलि मूठ रुपेरी
उतरला नूर अधिकारी । अन् होइ देवडीवाला ॥ १ ॥

हळुहळू चढोनी वरती, सरकारकुन होत अतांशी ।
व्यवहार सर्व त्यांवरती, लेखांच्या पडल्या राशी ।
कवितांच्या गोणी येती, लागला स्वर्ग हाताशीं ।
ध्यानांत ध्येय आणोनी, बान्धले मिनार मनाशीं ।
मानाचें तोंच विमान
घेतसे मनीं उड्डाण
आणिलें ' रीम ' जाऊन,
दारास कडी घालून । सारखा लिहीतचि सुटला ॥ २ ॥

खपविण्या लिखाणें अपुलीं, कवि घेउन त्याला फिरती ।
नाटकें नेहमीं म्हणुनी, फुकटांत पहाया मिळतीं ।

परि ध्येयापुढती त्याची, त्याला न वाटते भीती।
अन् याच कारणें आला, लोकांच्या नजरे पुढती।
सन्मान्य तसा विद्वान
प्रतिभेत तसा संपन्न
साहित्यभक्तिचें वाण
धोतरांत बांधुनि फडकें लेखकांत कुलपी गोळा॥ ३॥
तों एके दिवशीं आला, अगदींच अचानक घाला।
'अफिसाला' टाळा बघतां, टाळूला धक्का बसला।
राहिली रद्दि घेवोनी, संपादक विकण्या गेला।
मॅनेजर मानी मोठा, राहिला भजी तळण्याला।
'दररोज प्रभावी वाणी
प्रगटावी त्याला[1] वाणी[2]
बघण्याचे नशिबीं आणी'
उद्गार तसे सुस्कार सोडुनी बोलतां झाला॥ ४॥
'दुसऱ्यांच्या लेखांवरती, 'प्रतिभेचा पूजक' बनलों।
परि खरें ज्ञान ना माझें, साहित्य-लुटारू ठरलों।
अवतार संपला आतां, चोरीच्या माला मुकलों।
या! खुदा! जरा थांबा ना? वळकटी बांधुनि आलों!'
वर्तमानपत्र—कचेरी
असतांना केली चोरी
परि बिंग न ये बाहेरीं
छापुनी बातमी आलो मक्केला लेखक गेला।
कीं, अखेर लिहुनी थकला संन्यस्त व्रतां आचरला॥ ५॥

---

१. त्या वर्तमानपत्राला. २. किराणा व भुसारी मालाचा व्यापारी.

# २१

## पन्तविलास—

जरेकरि जरि साठींतला असावा
पंचवीशींतिल तरुण तो दिसावा !
रोज प्राशी कुष्मांडपाक शेर
शक्ति येई शेरास दोन शेर

मयत होतांक्षणि द्वितिय पत्नि त्याची
हौस वाटलि त्या तृतिय करायाची
खडा टाकाया बाप नाडलेले
गृहा त्याचीं या दिसत लोटलेले

सुमुहूर्तावर मोडुनी 'रुई' भार्या
चतुर्थीला वाहिली कृष्ट काया,
पत्नि विरहानें पन्त वाळलेले
प्रीति पाण्यानें पुन्हां लठ्ठ झाले

पन्त—पत्नीच्या विलासास भरती
आलि एके दिनिं अमावास्य रात्रीं
पन्त गेले आलिंगण्या प्रियेला
अहा ! कडकल्या अस्थि त्या क्षणाला !

ओष्ठ ओष्ठां भिडणार तोंच आली
पन्तवदनीं कृत्रीम दन्तकवळी
पत्नि सरके बाजूस होत खन्त
पन्त वदती मनिं मात्र 'हन्त हन्त !'

कल्प काळा जावूनिया मिशांचा
ओष्ठि उमटे अन् ठसा तो प्रियेच्या
'जरा' पन्तांची उघडकीस आली
पत्नि त्यांची मनिं दिसे विरमलेली

प्रेमरङ्गीं बेरङ्ग असा झाला
तसा पन्तांना धडा आठवीला
" वृकाचें त्यां जरि चर्म वेष्टियेलें
तरी कोल्ह्याचें रूप कळुनि आलें. "

# २२

# प्रेमाचें प्रहसन !

( जाति–शूर्पणखा )

पात्रें:—रामा–घरचा गडी. सिताबाई–घरची भान्डी घांसणारीण. लक्ष्मण–घरचा कारकून. स्थळ:—स्वयंपाकगृह. वेळ आभाळ असल्यामुळें नक्की सांगणें अशक्य. )

मन गेलें तुझ्यावर जडून् ।
रामा, मन गेलें तुझ्यावर जडून् ॥ ध्रु ० ॥
बघ जळे कधीं फोडणी
कधि नसेल मिठ सांघर्णी
अशि सदा स्थिती गेलि होऊन् । रामा०
तव मूर्त दिसे हांसरी
पळिमधील तेलान्तरीं
क्षण कसा न जाइ तुजवांचून । रामा०
सिनेमाला गेली मण्डळी
चल कुणी न बघण्या मुळीं
ये भेटूं अतां कडकडून । रामा०
दूध तूप तुला चारितें
घरकाम तुझें उरकितें
चल 'चिमणि'[१] चकोरा टाकून् । रामा०

१ रामा दिव्याची चिमणी पुशीत होता.

असें वदली वेणींस दाखवीत
तोंच दिसली त्या विडी कोपऱ्यांत !

" ऐक " वदला मग, " प्रतिज्ञा अघोर "
" विड्या तोंडानें रोज ओढणार

आणि नाकानें कळ्या हुङ्गणार
पुन्हां जेंव्हां होईल मम पगार ! "

... ग्रंथ संग्रहालय
1131
दा. ३।०५ नं.
ता.
ठाणे.

# २५

# सौन्दर्यावरची साय ?

गाला ताम्बुस प्रेमरङ्ग दिसतो वाटे लुटावी मजा
माझा हस्त फिरे तसाच पडला तो ' फेस ' फक्की वजा !
झाला सर्व प्रकार चक्क दिसला आली पुढें मेनका ?
' आहे फॅशन ही ' म्हणून वदली लावून ' फक्की ' * मुखा
अम्बाडा बहु सैल सुन्दर रुळे मानेवरी लठ्ठसा
वाटे त्वां कधिं लाविलास असर्सी कामीनिया खूपसा
वेणी घालित पाठमोरि बसली होतीस तूं ज्या क्षणा
आली भोंवळ देखतां तव करीं कृत्रीम गङ्गावना !
गालांच्या मउ मखमलींच गिरद्या, ही यौवनी कल्पना
झाली फोल बघून गाल तव ते ' कणिसापरी ' त्या क्षणा
उन्ची पातळ चापचोप दिसले त्वां नेसलेलें मना
वा ! ही औरच टापटीप वदतो तों दृष्टिला ये पिना !
चष्मा काढुन ऐटदार बसली होतीस एके दिनीं
' डोळेझांक ' करावि वाटुनि मला गेलों हळूं मागुनी
' सोडा ' ओरडली, अणीक वदली, 'हें काय डोळा फुटे'
कांचेचा बघ नेत्र कृत्रिम असे आले कळोनी तिथें !

× × ×

' हल्लीचीं तरुणी ' असें पटविण्या चक्की तुवां दाविली
सारीही वरचीच साय बघुनी माझी मती कुण्ठली !

---

* ' फेस फक्की ' = फेस पावडर.

## २६

# —' पण ' जिङ्किला पण........?—

" पांच पुष्पें एकाच वेलिवरती
फुलति दाविल त्यां वरिन हीच खात्री ! "
कुणा कन्येने असा ठाविलेला
कवी ' पण ' तो जिंकण्याला निघाला.
" ' कवी' म्हणुनी कित्येक ' स्थळें ' गेलीं !
बार आतां उडवीन याच सालीं "
स्वगत वदला, " जिंकीन तिला आतां " !
आणि टिपुनी घेतला तिचा पत्ता.
" बहुत सुटले वैशाख आजवेरी "
वदे, " कविची परि दावितो हुषारी [ ? ]"
तडक चिठ्ठी जाऊन घरीं दिधली.
पुढिल होत्या त्यांवरी आठ ओळी.
[ नयन ! कमळें ! अन् नाक ! सोनचांफा !
गुलबांचा तर दोन गालि ताफा
कुन्द ! दातांचें ! कान ! कर्णपुष्पें !
वेल ऐशी ' स्त्री ' जेथ पांच पुष्पें !
असो. आतां सत्वरीं [ ? ] भेट दे तूं
उभा दारीं, सुंदरीं, सोड किन्तू
विलंबाचीं अजि कारणें न दिसती
तुझा ' पण ' मी जिंकीत तुझ्यासाठीं. ]

उभा होता कवि धरुन हार हातीं
प्रिया (?) कुबडी टेकीत येत होती,
कवी विस्फारुन बघे जों न थोडा
तोंच वदली ती, जवळ नेत तोंडा—
" अहा ! मजला जिंकिलें ! धन्य झालें !
नको कुबडी ! ' आधार ' कर मिळाले !
तोंच तुटुनी लाकडी पाय, पडली
हाय ! निपचित अन् ' वेल ' खालिं आली
" नसे भार्येचा मला दैवयोग
नको म्हणणें कोणास यापुढें ' ग '
नसें ' हक्काचें ' कणी या जगांत "
कवी वदला पण सर्व हें ' मनांत ' !
त्याच हाराचीं फुलें तोडुनीया
तिच्या प्रेतावर दिलीं उधळुनीयां
गच्च डोकें बांधून कवी गेला
मर्तिकाचें सामान घ्यावयाला ! !

—

वाण्डगूळ

## २७

# भास!

तव भास अन्तरा झाला, मन रमतां दप्तरी[१].
कुरवाळितां चम्पि कुत्री
अस्वलअङ्गी हो खात्री
शोधाया त्यांतच लागे मी अपुली छोकरी[२].

गालिं खळी अन् पुष्पकळी
कवि वर्णित वेळोवेळीं
खळि नसे पण पळी[३] येवढी पुळी तुझ्या अधरीं.

रस्त्यांतिल वेंचक वारा
कमेटिचा[४] परिमळ सारा
तव दन्तपंक्ति गन्धाची कीं, देतो माधुरी.

सनईचे सङ्गीत घुमत
ताशांची तडतड त्यांत
झणकार वदनवीणेचा (?) तव तैसा भेसुरी.

---

१ ऑफिसच्या कामांत असतां. २ लाडिकपणें पत्नीच्या नांवांचा उद्धार केला आहे. ३ संध्येची. ४ पूर येऊन रस्त्याच्या दुथडी वाहत चाललेली कचऱ्याची निर्झरणी. दाखल्यादाखल पाहुण्यांनीं पुणें प्रान्त पहावा.

म्हैस काळी, गळीं ओढणें
कण्ठ वाकें काञ्चनानें,
रङ्गरूपि तव साम्य देखुनी, जिरलों अन्तरीं.

उठे खाया तुझी काया
पिछाडतें मज तव छाया
जर भास सत्य हे होती, मग मिरच्यांची धुरी [1]!

---

१ स्वत:ला उलटे टांगून.

## २८

# मुखशुद्धी ?

[ पाडव्याच्या दिवशीं, भोजनप्रसंगीं पतिपत्नीमध्यें चाललेला संवाद ]

‘ सावन्तवाडिचा रङ्गि पाट मांडिला, ’
‘ तो रुचे न मजला माण्डी पाहिजे तुझी आजला ’
‘ ठेविलें रुपेरी ताट आज भोजनीं. ’
‘ त्यामधें मुका शशि राका मज दिसे तुझ्या आननीं.’
‘ सैरपी शुभ्र, भोंवती स्वतः काढिल्या
‘ ती तुझी आवडे वेणी मज जींत जुईच्या कळ्या.’
‘ ही मूद मधोमध वरण वरी ओतलें ’
‘ ती हुबेहुब गौराङ्गी वरि पीतवस्त्र वेढिलें.’
‘ त्या पुरीवरी श्रीखण्ड–डाव ओतली ’
‘ त्यांतील खुलें चारोळी, तिळ तुझ्या कपोलीं, ‘ खुळीं ’
‘ बरं, कसा काय सैंपाक लागतो गडे ! ’
‘ तें काय विचारावें ! वाः ! त्यापेक्षां गिळणें खडे ’ !
‘ जा गडे, न आम्ही, इश्य ! काय हें असें ? ’
‘ बरं बुवा ! राहिली थट्टा, जाहलें छान अनरसे ! ’
किति हिणवायाचे, बाइ कळेना मला ’
‘ भरवुनी घांस झणि माझें करि बन्द तोंड आजला ! ’
‘ छे ! कुणी तरी पाहील, जरासें दमा,’
‘ ये अशी बैस शेजारीं, धरुं नको जगाची तमा. ’
‘ छे ! नको सखे, सङ्कोच, सोडि गे ‘ दुही ’
‘ घ्या गडे ’ जेवुनी आधीं मग मिळेल ‘मुखशुद्धि’ ही ! ’

# २९

# पळवाट !

( जाति--नवती )

**‘ पळवाटीच्या ’ खाणाखुणाः—**[ मार्गांत बोचणारी अशी कोणतीच ‘ अडगळ ’ नाहीं. प्रस्तुत काव्य म्हणजे एक विनोदी विडम्बनात्मक पतिपत्नीतील संवाद आहे. पतीला बाहेर बरेंच कर्ज झाल्यामुळें व तें भागविण्याची त्याच्या अङ्गीं कुवत नसल्यानें त्याला देणेकऱ्यांचीं तोंडें चुकवावीं लागत व म्हणूनच तो रात्रंदिन घरीं दडून बसे. परंतु त्याच वेळीं ही गोष्ट आपल्या पत्नीला कळूं नये अशी त्याची इच्छा असते; पण शेवटीं देणेकऱ्यांचा घडाका त्याच्या दारापर्यंत येऊन पोचतांच साहजिकच पत्नीला त्यांच्या आवाजाची चाहूल लागून स्त्रीसुलभ भीति वाटते.]

**पत्नीः**—दार वाजलें, उठुन पाहिलें
रोज रोज फटींतून पाहतों मुलें.

बसतसां दिनीं, दार लावुनी
आसपास कुजबुज हो नाक मुरडुनी

झोंप घेतसां, दिवस जणुं निशा
काय समजुं बाइ जुलुम हा असा कसा ?

मित्र ‘ इकुडचे,’ येति रोजचे,
‘ नसति घरीं,’ म्हणुनि सांगु कोणत्या वचें !

चूळ जा भरा; मंडई करा,
बांधुनी कपाळ पुन्हां घरिंच आसरा !
तोंड लपविणें, कसलिं लक्षणें !
( मी न चोर हृदयिं तुझें हास्य—चांदणें ! )
( काढिली रजा, अनुभवी मजा
संगतींत गोड तुझ्या )—'अम्ही नाहिं जा.'—
दार वाजलें, बोबडी वळे,
—' उसनवारि चुकविण्यास सोंग हें भलें !'—,
दारिं ओरडा, ' आज वायदा '
( ऊठ पहा, तूंच सांग, यावया उद्यां )
—' कठिण कंठणें, यापुढें जिणें !'—
( माहेर तुझें रात्रि-गांठु आगगाडिनें. )—

9939 काव्य

५८९०

# साहित्य-गुदाम

लेखक

वि. मा. दी. पटवर्धन

एम्. एस् सी.

[ विनोदी लेख-संग्रह ]

किंमत १॥ रुपया

[ पृष्ठे २६२ ]

मुंबई इलाख्यांतील शाळांत लायब्ररी व बक्षिसाकरितां मंजूर झालेले.

---

# संग्राह्य पुस्तकें

सं. दाम्पत्य रहस्य (ताम्हणकर) १-०-०

प्रो. वामन मल्हार जोशी चरित्र ०-१२-०

माझे उच्छ्वास नाथ १-०-०

हृदयाचे कढ १-०-०

नाट्यछटा दिवाकर १-४-०

प्रकाशक

मॉडर्न बुक-डेपो

आनंदाश्रमासमोर, पुणें २.